मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/ पाणंद रस्ते योजना अंतर्गत सन २०२१-२२ वर्षाच्या आराखड्यास मान्यता देणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)**

**शासन शुध्दीपत्रक क्रमांक- मग्रारो-२०२२/प्र.क्र.०२/रोहयो-०६अ**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक-: २१ फेब्रुवारी, २०२२.

वाचा : १) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २५/०१/२०२२

२) शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक मग्रारो-२०२१/प्र.क्र.२९/रोहयो-१०अ, दिनांक ११/११/२०२१

**शासन शुध्दीपत्रक :-**

"मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजने" अंतर्गत उपरोक्त "वाचा" येथील दिनांक २५/०१/२०२२ रोजीच्या शासननिर्णयान्वये सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी शेत/पाणंद रस्त्यांच्या आराखड्यास काही अटी व शर्ती यांच्या अधिन राहुन मान्यता देण्यात आली आहे. सदर शासननिर्णयातील अटी /शर्ती मधील अट क्र. २) खाली सुधारीत केल्याप्रमाणे वाचण्यात यावी.

**'परिशिष्ट-अ' मध्ये नमूद शेत /पाणंद रस्त्यांची कामे सुरु करण्यापुर्वी सदर शेत/पाणंद रस्त्यांचा महसुल विभागाच्या संबंधीत गाव नकाशामध्ये समावेश असल्याबाबत किंवा शेत/ पाणंद रस्ता संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशान्वये अस्तित्वात आला असल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. तसेच, ज्या ठिकाणी शेत/पाणंद रस्त्यांचा समावेश महसुल विभागाच्या संबंधीत गाव नकाशामध्ये नाही किवा शेत/ पाणंद रस्त्यासंदर्भात संबंधीत सक्षम प्राधिकारी यांचे आदेशही नाहीत, अशा प्रसंगी शेत/ पाणंद रस्ता ज्या शेत/जमिनीतुन जातो अशा शेत/जमीनीचे मालक यांची लेखी संमती घ्यावी. शेत/पाणंद रस्त्यांच्या कामासंदर्भात ग्रामपंचायतच्या मालमत्ता नोंदवहीमध्ये/रस्ते नोंदवहीमध्ये नोंद घेतांना सदर संमतीपत्राचा उल्लेख करण्यात यावा.**

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२२०२२११५५५५६२६१६ असा आहे. हे शासन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDKUMAR VERMA

( नंदकुमार )

अपर मुख्य सचिव (रोहयो)

पृष्ठांकण पत्र क्र. जिपअम/मग्रारोहयो/सकाअ/२४८/२०२२

कार्यालय(मग्रारोहयो कक्ष),जिल्हा परिषद,अमरावती

दिनांक:- 23 / 02 /२०२२

प्रति,

गटविकास अधिकारी,

पंचायत समिति,------------------------(सर्व)

"मातोश्री ग्राम समृद्धि शेत / पानंद रस्ते योजना" अन्तर्गत उपरोक्त "वाचा" येथिल दिनांक २५/०१/२०२२ रोजीच्या शासननिर्णयाप्रमाणे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी शेत / पानंद रस्त्यांच्या आराखड्यास काही अटी व शर्ती यांच्या अधिन राहुन मान्यता देण्यात आली आहे .सदर शासन निर्णयातील अटी व शर्ती मधील अट क्र.२ सदर **शुद्धीपत्रकात सुधारीत** केल्याप्रमाणे वाचण्यात यावे. तसेच सदरील निर्देशांचे तन्तोतंत पालन करण्यात यावे.

उप जिल्हाकार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)

जिल्हा परिषद, अमरावती

६. मा. विरोधी पक्षनेते,विधानसभा यांचे खासगी सचिव,विधानभवन,मुंबई.
७. मा. समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती,विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांचे सहसचिव,मंत्रालय,मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. आयुक्त, नरेगा, नागपूर.
१२. आयुक्त (कृषी),महाराष्ट्र राज्य,पुणे.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.
१५. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१६. सर्व अधिक्षक अभियंता/पाटबंधारे आणि सर्व अधिक्षक अभियंता/ लघुपाटबंधारे(स्थानिकस्तर)
१७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
१९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२०. सर्व उपायुक्त (विकास).
२१. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
२२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
२३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२४. सर्व सहसचिव/उपसचिव/ अवर सचिव / कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई.
२५. निवडनस्ती रोहयो-६अ.